# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१६/2956 दि. 18/10/16

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित, विना-अनुदानित महाविद्यालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७ च्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भः १. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०१६-१७/९७८४, दि.१९.०८.२०१६
२. या कार्यालयाचे पत्र क्र.विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१६/२४०९, दि.२३.०८.२०१६
३. या कार्यालयाव्दारे दि.२१.०९.२०१६ रोजी आयोजित कार्यशाळा.
४. मा. संचालनालयातर्फे आयोजित दि.२८.०९.२०१६ च्या कार्यशाळेतील मार्गदर्शन.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१, ३ व ४ अन्वये कळविण्यात येते की, सदर शिष्यवृत्ती करीता अर्ज करतांना विद्यार्थ्यांची कोणतीही कागदपत्रे या कार्यालयास जमा करावयाची नसल्याने या कार्यालयामार्फत केली जाणारी अर्जांची तपासणी ही केवळ आणि केवळ महाविद्यालयांनी / संस्थांनी केलेल्या तपासणीच्या आधारे होत असल्याने महाविद्यालय / संस्था यांचेकडून सदर शिष्यवृत्तीचे अर्जांची तपासणी काळजीपूर्वक व जबाबदारीने करण्यात यावी. अन्यथा भविष्यात काही चूकीची माहिती उघड झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य, महाविद्यालय / संस्था यांची राहील याची नोंद घ्यावी.

**टिपः** जर एखाद्या विद्यार्थ्याने अर्जात भरलेली माहिती चूकीची दिसून येत असेल व ती आपले स्तरावरुन **Edit** होत नसेल तर सदर अर्ज थेट **Reject** न करता **Defect** मध्ये टाकून सदर विद्यार्थ्यास ती चूक सुधारण्याची संधी देण्यात यावी. तद्नंतर सदर विद्यार्थ्याने ती चूक दुरुस्त केल्यास तो अर्ज पुनश्चः आपले स्तरावरुन तपासणी करुन **Verify** करण्यात यावा.

RBkosley
18/10/16
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रतः मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.